## *प्रेसनोट*

जा.क्र. पोउआ/वाहतूक/१९२१ /२०२१ पुणे शहर, दिनांक- ३०/०४/२०२१

**विषय :- मार्केटयार्ड,पुणे येथे होणा-या गर्दीचे अनुषंगाने दिनांक ०२/०५/२०२१ ते १६/०५/२०२१ दरम्यान वाहतूक व्यवस्थेत होणा-या बदलाबाबत...**

-------------oo----------

पुणे शहरामध्ये कोविड-१९ या साथरोगाची संसर्ग साखळी तोडण्यासाठी प्रशासनाने ब्रेक द चेन नुसार प्रतिबंधात्मक आदेश पारीत केलेले आहेत.परंतु मार्केटयार्ड, पुणे याठिकाणी किरकोळ खरेदी करीता नागरीकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने त्याबाबत कृषीउत्पन्न बाजार समिती मार्केटयार्ड,पुणे व प्रशासन यांचे बैठकीत झालेल्या चर्चेअंती सर्व संमतीने मार्केट कमिती यांनी किरकोळ खरेदी पुर्णपणे बंद करण्याची व ठोक खरेदी चालू ठेवण्याचे निर्णय घेतले आहेत,त्याअनुषंगाने मार्केटयार्ड,पुणे याठिकाणी वाहतुक सुरळीत व सुरक्षीत चालणे इष्ट आहे तसेच कोविड-१९ या साथरोगाचा फैलाव वाढू नये याकरीता प्रतिबंधात्मक म्हणून,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी,राहुल श्रीरामे, पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन आवश्यकत्तेनुसार दिनांक- ०२/०५/२०२१ रोजी रात्री ००.०१ वाजेपासून ते दिनांक- १६/०५/२०२१ रोजी २४.०० वा.पर्यंत खालील नमूद मार्गावरील वाहतुक बंद करून ती पर्यायी मार्गाने वळविण्यात येत असून त्याबाबतचा आदेश पारीत करीत आहे.

- **वाहतुक बंद रस्ता- वखार महामंडळ चौक ते मार्केटयार्ड(उत्सव चौक) व मार्केटयार्ड (उत्सवचौक) ते वखार महामंडळ चौक पर्यंत रस्ता वाहतुकीस बंद ठेवण्यात येत आहे.**
- **मार्केटयार्ड येथे ठोकखरेदी चालू ठेवली असल्याने त्याकरीता येणा-या वाहनांकरीता, केळी बाजाराचे गेटमधून प्रवेश देण्यात येणार आहे व त्यांनी बाहेर पडण्याकरीता मेनगेटमधून बाहेर पडून उजवीकडे वखारचौक व डावीकडे मार्केटयार्ड(उत्सव चौक) असे इच्छितस्थळी जातील.**

**(सही/-)**
पोलीस उप आयुक्त,वाहतूक
पुणे शहर